सकाळ





**जनरल अरुणकुमार वैद्य स्टेडियम, भवानी पेठ :** मुष्टियुद्ध स्पर्धेत पदक विजेत्या खेळाडूंसह पूनावाला फिनकॉर्प कंपनीचे उपाध्यक्ष (ब्रँड आणि सोशल मीडिया-मार्केटिंग) शंकर नंबीमदाथिल. पहिल्या छायाचित्रात मुलांचा १२ ते १४ वर्षे वयोगट. दुसऱ्या छायाचित्रात १४ ते १६ वर्षे गटातील मुले आणि तिसऱ्या छायाचित्रात १४ ते १६ वर्षे वयोगटातील मुली.

# नरेंद्र, श्रेयांश, आर्यनचा ‘सुवर्ण’ ठोसा

## मुलींत सुविज्ञा, स्नेया, संस्कृती यांची बाजी

**पुणे, ता. २८ : पूनावाला फिनकॉर्प प्रस्तुत सकाळ स्कूलिंपिक्स मुष्टियुद्ध स्पर्धेमध्ये मुलांच्या १२ ते १४ वर्षे वयोगटात नरेंद्र टेकाळे, ओंकार मोरे, श्रेयांश गायकवाड, हमजा शेख आदींनी, तर १४ ते १६ वर्षे वयोगटात आर्यन सोनावणे, नीरज विश्वकर्मा, सार्थक पवार आदींनी अजिंक्यपद पटकाविले. मुलींच्या याच वयोगटात सुविज्ञा दोडके, स्नेया फाळके, संस्कृती होव्हाळ यांनी बाजी मारली.**

बॉक्सिंग

भवानी पेठेतील जनरल अरुणकुमार वैद्य स्टेडियमवर वरील स्पर्धा झाली. पूनावाला फिनकॉर्प कंपनीचे उपाध्यक्ष (ब्रँड आणि सोशल मीडिया - मार्केटिंग) शंकर नंबीमदाथिल यांच्या हस्ते स्पर्धेचे पारितोषिक वितरण झाले.

मुलांच्या गटात स्पर्श घोरपडे, आर्यन सोनावणे, कल्पक शिंदे आदींनी आक्रमक खेळ करत पहिल्या फेरीतच प्रतिस्पर्धी खेळाडूला गारद केले.

### निकाल

**१२ ते १४ वर्षे मुले : २८ ते ३० किलो** - मयुरेश दरेकर (एंजेल,उरुळी कांचन) पराभूत वि. ओंकार मोरे (क्रीडा निकेतन, येरवडा).

**३२ ते ३४ किलो** - विवेक पांडेय (एंजेल, उरुळी कांचन) पराभूत वि.शेखर कुंवर (श्रीमती वालुबेन मावजी पटेल इंग्लिश मीडियम, रविवार पेठ).

**३४ ते ३६ किलो** - शिवम सौंदाळे (पेरिविंकल इंग्लिश मीडियम, पिरंगुट) पराभूत वि. वेदांत कापसे (केंब्रिज इंटरनॅशनल, चिंचवड).

**३६ ते ३८ किलो** - करण पांगारे (सह्याद्री नॅशनल, वारजे माळवाडी) पराभूत वि.समर्थ सोनावणे (विद्या निकेतन, बिबवेवाडी).

**३८ ते ४० किलो** - नरेंद्र टेकाळे (आर्मी पब्लिक, दिघी) वि.वि. सोहम शिंदे (एंजेल, उरुळी कांचन).

**४० ते ४२ किलो** - समीर अहमद (कर्नल भगत इंग्लिश, खडकी) पराभूत वि. हमजा शेख (द बिशप्स, कॅम्प).

**४२ ते ४४ किलो** - श्रेयस शेवाळे (ज्ञानसंस्कार इंग्लिश मीडियम, पुणे) वि.वि. दुर्वांक पिंगळे (अपेक्स इंटरनॅशनल, चऱ्होली बुद्रूक).

**४४ ते ४६ किलो** - पार्थ महाजन (सिंहगड स्प्रिंगडेल पब्लिक, वडगाव बुद्रूक) पराभूत वि.श्रीनाथ खेतकर (अपेक्स इंटरनॅशनल, चऱ्होली बुद्रूक).

**४६ ते ४८ किलो** - आयुष होनकळसे (अपेक्स इंटरनॅशनल, चऱ्होली बुद्रूक) वि.वि. विराज शेंडगे (सिंहगड स्प्रिंगडेल पब्लिक,वडगाव बुद्रूक).

**४८ ते ५० किलो** - श्रेयांश गायकवाड (सेंट अरनॉल्ड सेंट्रल, वडगाव शेरी) वि.वि. श्लोक कुंजीर (एंजेल, उरुळी कांचन).

**१४ ते १६ वर्षे : ४६ किलोखालील :** प्रणव राडे (नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिकी, फुलगाव) वि.वि. अक्षय घोडे (नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिकी, फुलगाव).

**४६ ते ४८ किलो** - आयुष बगाडे (एंजेल, उरुळी कांचन) पराभूत वि. कल्पेश बिका (बन्सीलाल रामनाथ आगरवाल हिंदी, रविवार पेठ).

**४८ ते ५० किलो** - प्रणीत दावडीकर (एस.एस.इंग्लिश मीडियम, येरवडा) वि.वि. श्रेयस सावंत (नॅशनल चिल्ड्रेन्स अॅकेडमी, वडगाव शेरी).

**५० ते ५२ किलो** - आदित्य कवडे (श्री शिवाजी प्रिपेटरी मिलिटरी, शिवाजीनगर) पराभूत वि. स्पर्श घोरपडे (सिंहगड स्प्रिंगडेल पब्लिक, वडगाव बुद्रूक). **५२ ते ५४ किलो** - आर्यन सोनावणे (विद्या निकेतन इंग्लिश मीडियम, बिबवेवाडी) वि.वि. मोहम्मद साद खान वासीम (कर्नल भगत इंग्लिश मीडियम, खडकी).

**५४ ते ५७ किलो** - निवृत्ती निकम (नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिकी, फुलगाव) पराभूत वि.कल्पक शिंदे (नालंदा इंग्लिश मीडियम, मंचर).

**५७ ते ६० किलो** - दुर्गेश पवार (नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिकी, फुलगाव) पराभूत वि. प्रितेश राठोड (डीजीएस हेम).

**६० ते ६३ किलो** - युवराज पाटील (श्री शिवाजी प्रिपेटरी मिलिटरी, शिवाजीनगर) पराभूत वि. नील शहा (द लेक्सिकॉन इंटरनॅशनल, कल्याणीनगर).

**६३ ते ६६ किलो** - नीरज विश्वकर्मा (विलो पूनावाला इंग्लिश मीडियम, कॅम्प) वि.वि. श्रेयस बाबर (ब्ल्यू रीज पब्लिक, हिंजवडी).

**६६ ते ७० किलो** - उत्कर्ष बडेकर (एंजेल,उरुळी कांचन) पराभूत वि. सार्थक पवार (श्री शिवाजी प्रिपेटरी मिलिटरी, शिवाजीनगर).

**७५ ते ८१ किलो** - सार्थक भिलारे (श्री शिवाजी प्रिपेटरी मिलिटरी, शिवाजीनगर) पराभूत वि.आर्यन लोहगावकर (वॉलनट, शिवणे).

**८१ ते ८६ किलो** - आरुष म्हसकर (श्री शिवाजी प्रिपेटरी मिलिटरी, शिवाजीनगर) पराभूत वि. ईशान देशमुख (श्री शिवाजी प्रिपेटरी मिलिटरी, शिवाजीनगर).

### मुलींच्या गटातही चुरस

**१४ ते १६ वर्षांखालील मुलींच्या ४४ ते ४६ किलो वजनगटात सुविज्ञा दोडके (सिटी इंटरनॅशनल, महर्षीनगर) हिने त्रिशा भांबुरे (सिद्धेश्वर हायस्कूल, भोसरी) हिला गुणांच्या आधारे हरविले. ५३ ते ५६ किलो गटात स्नेया फाळके (सिटी इंटरनॅशनल, औंध) हिने लक्षिता वाघ (सेंट मीराज इंग्लिश मीडियम) हिच्यावर दुसऱ्या फेरीत मात केली. तर ६६ ते ७१ किलो गटात संस्कृती होव्हाळ (अभिनव विद्यालय, एरंडवणे) हिने सुरेख खेळ करत अनुष्का धुळे (एंजेल, उरुळी कांचन) हिला पहिल्या फेरीतच गारद केले.**